प्रति,

माननीय शिक्षण अधिकारी - माध्यमिक

(जिल्ह्याचे नाव - ) ठाणे

विषय: माहे जुलै २०२६ च्या केंद्रस्तरिय शिक्षण परिषदेत मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण आयोजन करणे बाबत.

संदर्भ: १) जा.क्र.राशैसंप्रपम/कला व क्रीडा/मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन २०२६-२७/ दिनांक २९ जून २०२६.

२) जा.क्र.आशिका/स्विस/मित्र उपक्रम/२०१९-२०२०/४८५६ दिनांक ८ ऑगस्ट २०१९

महोदय,

कृपया वरील संदर्भीय परिपत्रक पहावे (प्रत सोबत जोडली आहे). यानुसार माहे जुलै 2026 च्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत सर्व शिक्षकांसाठी मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे तीन तासाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत.

केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुख तसेच गट शिक्षण अधिकारी मार्फत शिक्षकांचे मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनांचे प्रशिक्षण घेणे अपेक्षित आहे. आनापान साधनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी केंद्रप्रमुख तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे जेणेकरून ते प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण घेऊ शकतील. यासाठी आपल्या सोयीनुसार योग्य त्या ठिकाणी केंद्रप्रमुख व इतर अधिकाऱ्यांना प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी आम्ही पूर्ण सहकार्य करून यांचे प्रशिक्षण पूर्ण करू. कृपया आपण याबाबत योग्य ते आदेश निर्गमित करावे ही विनंती.

धन्यवाद.

आपली कृपाभिलाशी,

मित्र समन्वयक संगीता भालेराव

9657391732

आवक लिपिक
माध्यमिक विभाग.
जि.प. ठाणे.
९/६/२६

आवक लिपिक
माध्यमिक विभाग.
जि.प. ठाणे.